अलंग-कुलंग, मदनसारख्या अत्यंत कठीण गडांवर एक चमू गेला. एका दिवसात हा मार्ग करणं म्हणजे मोठं आव्हानच. इतर मार्गांमध्ये शिवनेरी, हडसर, चावंड, जीवधन (मिलिंद कदम), अवंध पट्टा, बितनगड (संदीप चोरगावकर), पेठ, सिद्धगड, गोरखपेठ (सदानंद आपटे), ट्रिंगलवाडी, बळवंतगड (जगन्नाथ राऊळ), रतनगड, कलाडगड (आशुतोष साळवेकर), पाबरगड, भैरवगड (संजय जोशी), मोरोशीचा भैरवगड (प्रतीष साने), नारायणगड, निमगिरी, सिंदोळा (माधव फडके) असे विविध मार्ग विविध नेत्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडले.

या विविध खडतर मार्गांबरोबरच थेट हरिश्चंद्रगडावर येणाऱ्यांच्या बसेस राजूरमार्गे पाचनळीत पोहोचल्या. काही जण खिरेश्वरमार्गे हरिश्चंद्रगडावर आले. हरिश्चंद्रगडाचं दर्शन आणि आध्यात्मिक रसातली तल्लीनता यांचा सुंदर मिलाफ या संमेलनात साधला गेला. आपण लावलेलं रोप आज पुढच्या पिढीतल्या ट्रेकर्सनाही खुणावतंय, हे पाहून संस्थेचे संस्थापक सदस्य माधव कर्वे, अच्युत परचुरे, जयंत परचुरे, किशोर देशमुख आदींना भरून आलं.

## ...आणि पताका सजल्या

रौप्यमहोत्सवानिमित्त पताकांनी सजलेली हरिश्चंद्रगडावरची गणेशलेणी सुंदर दिसत होती. पण या पताका सजवण्यापूर्वी गड स्वच्छ करण्याची कामगिरीही पार पाडण्यात आली. ३१ डिसेंबरपासून गडावर साचलेला कचरा साफ करण्याचं काम गावकऱ्यांच्या मदतीने हाती घेण्यात आलं. १२ गोणी भरून कचरा वेगळा करण्यात आला. गडावरची गुहा, टाकी स्वच्छ करण्यात आली.







संस्थेच्या नावातल्या गमतीपासून या चराति चरतो भगः, क्रमणेन वसुंधरा, मनःपूतं समाचरेत् या तीन श्लोकांनी तयार झालेल्या अर्थापर्यंत विविध आठवणीही त्यांनी सांगितल्या. म. शं. मुळ्ये, अशोक थोरात, माधव कर्वे, गौरी कर्वे आणि विद्यमान अध्यक्ष अॅड. रवि परांजपे हे प्रत्येक टप्प्यावरचे अध्यक्ष तसंच संस्थेच्या प्रत्येक टप्प्यावर आधार ठरलेले महेश भालेराव, किरण देशमुख, विंदा देशमुख, रवि रुपवते आणि इतर कार्यकर्ते तसंच नवीन पिढीचे शिलेदार आशुतोष साळवेकर, अनिकेत चौधरी, अनिकेत रहाळकर या सर्वांची मनोगतं यावेळी माधव फडके यांनी उत्तमरीत्या टिपली.

दोन दिवस हरिश्चंद्रगडावरचं वातावरण वेगळंच बनून गेलं होतं. संस्थेचं वैशिष्ट्यं ठरलेली गाण्यांची लज्जत तर गडावर भरपूर ऐकायला मिळाली. ते आर्त स्वर बहुधा गुहेमध्येही असेच टिकून राहिले होते. एवढ्या लोकांची वर्दळ होऊनही गडाचं सौंदर्य टिकून राहील, याची आटोकाट काळजी घेण्यात आली. कार्यक्रमाच्या शेवटी आणखी एका उपक्रमाला मूर्तरूप मिळालं. हरिश्चंद्रगड उतरून आल्यावर खिरेश्वर इथे ट्रेकसमाप्तीच्या वेळी ट्रेकिंग गिअर हे ट्रेकर्ससाठी उपयुक्त ठरणारं एक मॅन्युअल प्रकाशित करण्यात आलं. सह्याद्रीमध्ये फिरताना फर्स्टएडपासून पर्यावरणसंवर्धनापर्यंत विविध प्रकारची खबरदारी कशी घ्यायची, याच्या बहुमूल्य टिप्स या पुस्तिकेत संकलित करण्यात आल्या आहेत.

अत्यंत नाममात्र शुल्कामध्ये ही पुस्तिका सर्वांसाठी उपलब्ध करून देण्याचा मानसही संस्थेने यावेळी व्यक्त केला. सह्याद्रीतली ही दिंडी अशा शब्दरूप मेव्याचा प्रसाद वाटल्यानंतर सुफळ संपूर्ण झाली.

**– मुंबई टाइम्स टीम**
mumbaitimes@indiatimes.com